नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०७/२०२६ (शनिवार )**

---

# अंमली पदार्थ गांजा ची वाहतुक करणारे ३ आरोपी अटक
# ०१ किग्रॅ २० ग्रॅम अंमली पदार्थ गांजा जप्त
# कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान —** दिनांक ११/०७/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अवैधरित्या गांजाची वाहतुक होत आहे. कन्हान पोलीसांनी सतर्कतेने पेट्रोलींग केली असता मौजा कांद्री शिवारात जबलपूर नागपूर हायवेकडुन गजानन नगर कडे येणाऱ्या रोडवर एक संशयीत वाहन मारूती ८०० कार क्र. एम एच ३० एफ ०५७५ मिळुन आले. नमुद पथकाने सदर माहीती मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण , श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात कारवाई करून संशयीत वाहन मारूती ८०० कार क्र. एम एच—३० एफ ०५७५ वाहनाची झडती घेतली असता डॅशबोर्ड मध्ये एका पॅकेटमध्ये अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. **आरोपी क्र. १) समीर शिवप्रकाश कश्यप, वय २२ वर्ष, २) हर्ष उमाशंकर निशाद, वय १९ वर्ष, ३) हर्ष ओमप्रकाश कश्यप, वय २३ वर्ष, तिन्ही रा. खदान नं. ३, पारशिवनी जि. नागपूर** हे मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा वजन ०१ किलो २० ग्रॅम किंमती २०,०००/—रूपये, मारूती ८०० कार क्र. एम एच—३० एफ ०५७५ किंमती ७०,०००/—रूपये, आणि ०३ मोबाईल किंमती ६०,०००/— रुपये असा एकुण १,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी**

**आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ८ (क), २०(ब)(ii)(ब), २२,२९ एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १४ हजार ४०० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १०/०७/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, रमना झोपडपट्टी नरखेड येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) विष्णु महादेव सलामे, वय ५१ वर्षे २) दिनेश भलाजी परतेती, वय ३५ वर्षे ३) छोटु उर्फ अजय रामभरोसे मोरे, वय ५० वर्षे, सर्व रा. रमना झोपडपट्टी, ता. नरखेड यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख**

**रक्कम १९००/—रूपये, ०२ नग मोबाईल किंमती १२,५००/—रूपये इतर साहित्य असा एकुण १४,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ०३ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १४ हजार ९७० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १०/०७/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, हिवरा रोड, हॉटेल राज हिवरा येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) महेश भोजराज नागपुरे, रा. शनिवार वार्ड रामटेक, जि. नागपुर २) अल्केश सुरेश साठवने, रा. शनिवार वार्ड रामटेक ३) निलेश बाळकृष्ण नान्हे, रा. शनिवार वार्ड रामटेक ४) अनिकेत गनेश पखिंडे, रा देवलापार ५) अमित बालाजी नागपुरे, रा. शनिवार वार्ड, रामटेक ६) वृषभ रमेश नाकाडे, आंबाळा, ता. रामटेक ७) राजेश राज दमाये, रा. रामटेक ०८) राहुल अरून खरकाठे, रा. रामटेक ०९) कुणाल उमाकांत बरगट, शितलवाडी रामटेक, जि. नागपुर यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम १४,७७०/—रूपये असा एकुण १४,९७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ०९ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## कोंढाळी पोलीसांच्या पाठपुराव्यामुळे महामार्गावरील उड्डाणपुलांवरील बंद लाईट (पथदिवे) तात्काळ सुरू

**पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील मौजा सतनवरी येथील राष्ट्रीय महामार्गावरील तसेच बाजारगाव आणि कोंढाळी येथील उड्डाणपुलांवरील लाईट (पथदिवे) काही दिवसांपासून बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता तसेच अपघात होण्याची शक्यता वाढली होती. याची गंभीर दखल घेऊन कोंढाळी पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्याशी अधिकृत पत्रव्यवहार करून समन्वय साधला. तसेच सातत्याने पाठपुरावा केला.**

**त्याअनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी त्वरित कार्यवाही करून मौजा सतनवरी, बाजारगाव आणि कोंढाळी येथील उड्डाणपुलांवरील सर्व बंद लाईट (पथदिवे) पुन्हा सुरू केले.**

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत शालेय बस/वाहन चालकांच्या विशेष बैठका आणि उपाययोजना तसेच विदयार्थ्यांना मार्गदर्शन

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ११/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत धर्मराज विदयालय, नारयणा विदयालय, इंदीरा गांधी विदयालय येथे आणि पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत के जॉन पब्लीक स्कुल येथे शालेय बस आणि इतर वाहन चालक, वाहक तसेच संबंधित शाळांच्या प्रतिनिधी यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीस सर्वोच्च प्राधान्य देत शाळा व्यवस्थापनाला शालेय बसची फिटनेस, विमा, परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, बस चालक व अटेंडंट यांची चारित्र्य पडताळणी  करून त्यांच्या राहत्या पत्त्याची व इतर आवश्यक माहितीची नोंद ठेवणे तसेच सर्व शालेय बसमध्ये आवश्यक सुरक्षा सुविधा, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र व सीट बेल्टची व्यवस्था करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शालेय बस चालक व अटेंडंट यांना वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वेगमर्यादेचे पालन करणे, विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणीच चढविणे व उतरविणे, वाहनाच्या खिडक्यांना आवश्यक सुरक्षा जाळी व रॉड बसविणे, पावसाळयात ओव्हरहेड वीजतारा, मोठी झाडे व इतर धोकादायक ठिकाणी वाहन उभे न करणे, वाहन नियंत्रित वेगाने चालवून अचानक ब्रेक लावण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घेणे तसेच सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. **तसेच उपस्थित शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतुक नियम, गुड टच, बैड टच, सायबर क्राईम इत्यादी विषयांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**





## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक १०/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन देवलापार, कळमेश्वर, कोंढाळी, मौदा, बेला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण २०४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे धनराज बाबुलाल तांदुळकर, वय ३३ वर्ष, रा. बोथिया पोलोरा, ता.रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी शिवदास धर्माजी मालोत, वय ३५ वर्ष, रा. शिवा, ता. जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी १) पंकज सुर्यभान धारपिडे, वय ४० वर्ष, रा. भुगाव, ता. कामठी २) प्रदीप सहादेव पाटील, वय ५६ वर्ष, रा. वरंभा, ता. कामठी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२

गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे कमलाकर विठ्ठल मडावी, वय ३४ वर्ष, रा. उरकुडापार, ता. भिवापुर, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १० लिटर मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण २०४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ११/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २३ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १७ आरोपी अशा एकुण ७३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २९ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३८ आरोपी अशा एकुण १८२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




महाराष्ट्र पोलीस
पोलीस ठाणे वडोदा
जि. नागपुर (ग्रा.)
Phone : 07109299100
ऑर्बिट
WIRES & CABLES












मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने